। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ८२ वा । बुधवार दिनांक ०३ जून, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### लग्नाचे अमीष दाखवून लैंगीक अत्याचार

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील ३७ वर्षीय महिला सन २०१९ पासुन ते आज पावेतो हिस एका गावातील एका तरुणाने लग्नाचे अमीष दाखवून सन २०१९ पासुन ते आज पावेतो मुलांचा सांभाळ करतो असे सांगुन तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. जातीवाचक शिवीगाळ करुन तु पोलीसांकडे गेलीस तर तुला जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.०१.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(१), ६४(२), ६९, ३५१(२)सह अ.जा.ज.अ.प्र.कायदा कलम ३(१)(डब्ल्यु)(ळ)(ळळ), ३(१)(आर) (एस) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### दिड लाखाच्या कॉपर वायरची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२९.१२.२०२५ रोजी बेंबळी हद्दीत तसेच शिवारातील सोराजीन आर ई सर्व्हीसेस प्रा.ली. कंपनीचे एसओएल १२७, १२६, ५८, १३०, ६४, १४४, ९६ लोकेशनवरील अंदाजे १,५०,००० किंमतीचे कॉपर वायर चोरुन नेला. व पवनचक्कीचे २,००,०००चे नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- युवराज अजित परतापुरे, वय २६ वर्षे, सुपरवायझर सेक्युरिटी एजन्सी रा. पाटोदा ता. जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### डॉल्बी सिस्टीमचा आवाजाचे उल्लघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मस्तान उर्फ सलमान एकबाल शेख, वय २१ वर्षे, रा.अक्कलकोट रोड सोलापूर यांनी दि.३१.०५.२०२६ रोजी मिरवणुकी मध्ये लावलेले वाद्य हे पारंपारिक पध्दतीने किंवा पोलीसांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे न लावता मालक आयोजकांनी वाहनावर (टॉप व बस) डॉल्बी डिजे साउंड सिस्टीमचा आवाज ध्वनी तीव्रतेपेक्षा व कर्णकर्कश ठेवून आदेशाचे उल्लघंन केले. यावरुन पोलीसांनी नमूद व्यक्तींविरुध्द भा.द.वि.सं. कलम-२२३, २८९, २७०, २९३ सह कलम ३, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम सह कलम ३, ४, ५, ६ ध्वनीप्रदुषण नियम २००० अन्वये संबंधीत पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०१ जुन रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १५० कारवाया करुन ९५,५०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## हवामान बदलाच्या लढाईत महिला सरपंचांचा पुढाकार

### धाराशिवमध्ये पहिल्या महिला पंचायत परिषदेत ३५ गावांचा सहभाग



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- वातावरण बदलाच्या जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर उपाययोजना आखण्यासाठी धाराशिवमध्ये सोमवारी महाराष्ट्रातील पहिल्या महिला पंचायत परिषदेचा उद्घाटन करण्यात आले. जगभरातील देश ज्याप्रमाणे दरवर्षी हवामान बदलावर कॉन्फरन्स ऑफ पार्टीज मध्ये एकत्र येतात, अगदी त्याच धर्तीवर ग्रामीण भागातील महिलांचे नेतृत्व केंद्रस्थानी ठेवून या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन १ आणि २ जून रोजी करण्यात आले आहे. या परिषदेसाठी ३५ गावांच्या महिला सरपंचांची उपस्थिती होती.

हवामान बदलाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील गावांमध्ये दुष्काळाची पूर्वतयारी, जलसुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन बळकट करणे हा या परिषदेचा मुख्य हेतू आहे. परिषदेच्या पहिल्या दिवशी धाराशिव जिल्ह्यातील ३५ गावांच्या महिला सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी एकत्र येत वाढते तापमान, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि बदलत्या ऋतुमानामुळे महिलांना सोसाव्या लागणाऱ्या त्रासाची मांडणी केली. स्वयंम शिक्षण प्रयोग (एसएसपी), वातावरण फाउंडेशन, आरएससीडी, राज्याचा वातावरणीय कृती कक्ष, असर सोशल इम्पॅक्ट आणि पीडीएजी यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद होत आहे.

पहिल्या दिवशी महिलांनी केवळ समस्याच मांडल्या नाहीत, तर त्यावर उपाय शोधत आपापल्या गावांचे ''वातावरणीय कृती आराखडे'' (क्लायमेट क्शन प्लॅन) तयार केले. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजेच २ जून रोजी या आराखड्यांचे सादरीकरण केले जाणार आहे. दुष्काळाची पूर्वसूचना मिळण्यास मदत करणाऱ्या एका विशेष अहवालाचे प्रकाशनही केले जाईल.

दुष्काळ, वाढती कर्जबाजारीपणाची समस्या, पाण्याची टंचाई आणि अवकाळी पावसामुळे उद्भवणारी परिस्थिती याकडे महिला, पुरुष आणि समाजातील वेगवेगळ्या घटकांचा पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न असतो. हाच फरक महिलांनी परिषदेत गाणी आणि नाटुकलीच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे मांडला. यामध्ये केवळ महिला-पुरुषांच्याच नव्हे, तर समाजातील वंचित व दलित घटकांवर होणाऱ्या हवामान बदलाच्या परिणामांनाही वाचा फोडण्यात आली.

## कळंबला मिळाला नवा 'सिंघम'! शकील शेख यांच्या एंट्रीने गुंडांचे धाबे दणाणले

धाराशिव/कळंब : (रामेश्वर डोंगरे) कळंब शहरातील वाढती गुंडगिरी, अवैध धंदे, मोबाईल चोरी, टवाळखोर टोळ्यांचा त्रास आणि वाहतूक कोंडी यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांसाठी मोठी बातमी समोर आली आहे. धाराशिव सायबर सेलमध्ये आपल्या कर्तव्यदक्ष आणि धडाकेबाज कामगिरीची छाप पाडणारे पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी कळंब पोलीस ठाण्याच्या प्रभारी पदाचा कार्यभार स्वीकारला असून शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या आघाडीवर आता नव्या पर्वाची सुरुवात झाल्याची चर्चा रंगू लागली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून कळंब शहरात बसस्थानक परिसरातील टवाळखोर टोळ्या, बाजारपेठेतील दादागिरी, अवैध धंदे, मोबाईल चोरी, खिसेकापूंचा सुळसुळाट आणि वाहतूक कोंडीमुळे सामान्य नागरिक त्रस्त झाले होते. अनेक वेळा तक्रारी होऊनही काही ठिकाणी परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये होती.

अशा वेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शकील शेख यांच्यावर विश्वास दाखवत कळंबची धुरा सोपवली आहे. त्यामुळे आता शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर किती आळा बसतो आणि कायदा मोडणाऱ्यांवर किती कठोर कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**अवैध धंदेवाल्यांची झोप उडणार?**

कळंब शहर आणि परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांविरोधात मोठी मोहीम राबवली जाणार का, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. अवैध वाळू वाहतूक, मटका, जुगार, अवैध दारू विक्री तसेच इतर बेकायदेशीर प्रकारांवर पोलिसांचा धाक निर्माण होणार का, हा प्रश्न सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

**बसस्थानक परिसर 'हॉटस्पॉट'**

कळंब बसस्थानक परिसरात अनेकदा टवाळखोर तरुणांचे टोळके, महिलांची छेडछाड, प्रवाशांना त्रास, मोबाईल चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. या भागात विशेष पोलिस बंदोबस्त आणि गस्त वाढवून शिस्त निर्माण करण्याची मागणी जोर धरत आहे.

**नागरिकांना अपेक्षा न्यायाच्या**

सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींना प्राधान्य, पोलीस ठाण्यातील कामकाजात पारदर्शकता, तक्रारींचा तातडीने निपटारा आणि कोणत्याही दबावाशिवाय निष्पक्ष कारवाई या बाबतीतही शकील शेख यांच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त होत आहेत.

## कळंबमध्ये दिव्यांगाचा अपमान; आरक्षित सीट नाकारत दुसऱ्या बसने जाण्याचा सल्ला!

कळंब (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ दिव्यांगांच्या सन्मानाच्या मोठमोठ्या घोषणा करत असताना प्रत्यक्षात मात्र दिव्यांग प्रवाशांनाच अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचा संतापजनक प्रकार दि . ३१ मे रोजी सकाळी कळंब ते लातूर बस गाडी ला जात असतांना कळंब बसस्थानकात घडली आहे. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या जागेवर सामान्य प्रवासी बसलेले असताना, संबंधित दिव्यांग प्रवाशाला जागा देण्याऐवजी तुम्ही उशिरा आला आहात, दुसऱ्या बसने जा असे सांगण्यात आल्याचा गंभीर आरोप लातूर आगाराच्या महिला वाहकांवर करण्यात आला आहे.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे ज्या धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत, त्याच जिल्ह्यात दिव्यांगांच्या हक्कांची अशी पायमल्ली होत असल्याने एसटी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लातूर आगाराच्या बसमध्ये दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या सीटवर दोन सामान्य प्रवासी बसले होते. संबंधित दिव्यांग प्रवाशाने नियमानुसार जागेची मागणी केली असता, महिला वाहकांनी आरक्षित सीट रिकामी करून देण्याऐवजी दिव्यांगालाच दुसऱ्या बसने जाण्याचा सल्ला दिला.

धक्कादायक बाब म्हणजे, मी याची ऑनलाईन तक्रार करतो असे सांगूनही संबंधित कर्मचाऱ्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. आरक्षित सीटवर बसलेल्या प्रवाशांना उठविण्याचे धाडस न दाखवता दिव्यांग प्रवाशालाच बाहेर उभे राहण्याची वेळ आणण्यात आल्याने उपस्थित प्रवाशांनी संताप व्यक्त केला.

शासनाने दिव्यांगांच्या सन्मानासाठी नियम केले आहेत की फक्त जाहिरातींसाठी? असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. दिव्यांगांसाठी राखीव जागेवर सामान्य प्रवासी बसणार आणि हक्काची जागा मागणाऱ्या दिव्यांगालाच नकार मिळणार असेल, तर एसटी महामंडळातील नियम फक्त कागदावरच आहेत का? अशी चर्चा प्रवाशांमध्ये रंगली आहे.

परिवहन मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिव्यांगांना सन्मानाने वागणूक देण्याचे आदेश दिलेले असताना काही मुजोर कर्मचाऱ्यांकडून त्यालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र दिसत आहे. अशा घटनांमुळे शासनाची प्रतिमा मलिन होत असून दिव्यांगांच्या हक्कांवरच गदा येत आहे.

या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित महिला वाहकांवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, तसेच दिव्यांग प्रवाशांचा अपमान करणाऱ्यांना कोणतेही अभय देऊ नये, अशी जोरदार मागणी प्रवासी, सामाजिक कार्यकर्ते आणि दिव्यांग संघटनांकडून करण्यात येत आहे.

## धाराशिव जिल्हा न्यायालयात अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात



धाराशिव (प्रतिनिधी )जिल्हा व सत्र न्यायालय परिसरात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात निवृत्त प्रा. ए. डी. जाधव यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यकारभार, प्रशासन आणि लोककल्याणकारी कार्यावर सखोल व्याख्यान देत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. जाधव आणि जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ड. खंडेराव चौरे यांच्या हस्ते अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आपल्या व्याख्यानात प्रा. जाधव यांनी अहिल्याबाईंच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा आढावा घेताना त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा उलगडून सांगितला. तसेच प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना घडलेल्या विद्यार्थ्यांच्या आठवणींनाही त्यांनी उजाळा दिला.

अध्यक्षीय भाषणात ॲड. खंडेराव चौरे यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा आदर्श समाजाने घेण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहसचिव ॲड. संजय भोरे यांनी केले, तर आभार ॲड. मैंदाड यांनी मानले.

यावेळी उपाध्यक्ष ॲड. सुधीर नन्नवरे, सचिव बाळासाहेब आवड, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.. शांतीलाल कोचेटा, ॲड. अविनाश देशमुख, ॲड. शिवाजी भोरे, ॲड. अशोक गाजरे,ॲड. अमोल वरुडकर, ॲड. युवराज खैरे यांच्यासह मोठ्या संख्येने वकील बांधव व महिला वकील उपस्थित होत्या.

## एसटी संगे तीर्थस्थान योजनेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; कळंब आगार ठरत आहे श्रद्धेच्या प्रवासाचा विश्वासू साथीदार

कळंब (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कळंब आगाराने अधिक मासानिमित्त सुरू केलेल्या एसटी संगे तीर्थस्थान या विशेष उपक्रमाला भाविकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. कमी खर्चात, सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देत कळंब आगाराने धार्मिक पर्यटनाला नवी दिशा दिली आहे.

कळंब आगारातून राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांसाठी विशेष बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली असून यात श्री पुरुषोत्तम पुरी दर्शन, अष्टविनायक दर्शन, तुळजाभवानी दर्शन, शिर्डी, शेगाव, पंढरपूर, नांदेड, माहूरगड, गाणगापूर, अक्कलकोट, त्र्यंबकेश्वर, शनि शिंगणापूर, रायगड, दीक्षाभूमी नागपूर यांसह अनेक धार्मिक व पर्यटन स्थळांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे महिलांसाठी राज्य शासनाच्या धोरणानुसार ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील महिला व पुरुष प्रवाशांना १०० टक्के सवलत दिली जात असल्याने ज्येष्ठ नागरिक आणि महिलांमध्ये या योजनेबाबत विशेष आकर्षण निर्माण झाले आहे.

कळंब आगार प्रशासनाने भाविकांच्या मागणीनुसार गट प्रवासासाठीही विशेष बस उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे गावोगावी धार्मिक सहलींचे नियोजन अधिक सुलभ झाले आहे.

प्रवास श्रद्धेचा... सोबत आमची! या घोषवाक्याला साजेसा उपक्रम राबवत कळंब आगाराने प्रवाशांचा विश्वास संपादन केला आहे. सुरक्षित, आरामदायी आणि परवडणाऱ्या दरात तीर्थयात्रेची संधी उपलब्ध करून देत एसटी महामंडळ सामाजिक बांधिलकी जपत असल्याची भावना प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

कळंब आगार प्रमुख विजयकुमार धोलप यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, आगामी काळात आणखी नवीन तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्याचा मानस असल्याचे आगार प्रशासनाकडून सांगण्यात आले.या तीर्थ दर्शनाचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांनी वाहतूक नियंत्रक चेतन गोसावी, वाहतूक अधिकारी आनंत कवडे, निलेश जाधव यांनी आव्हान केले आहे

## जनतेच्या विविध प्रश्नांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; तातडीच्या उपाययोजनांची मागणी.डॉ.प्रतापसिंह पाटील



धाराशिव (प्रतिनिधी)- जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे मा. जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन जिल्ह्यातील नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये मूलभूत सुविधा, शासकीय योजनांमधील अडचणी तसेच जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध लोकहिताच्या विषयांचा समावेश होता.

वाढती महागाई, पेट्रोल-डिझेल व घरगुती गॅसच्या वाढत्या किमती, बेरोजगारीची गंभीर समस्या, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी, रखडलेली विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, वीज व महसूल विभागाशी संबंधित प्रश्न याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटींमुळे नागरिकांना होणारा मनस्ताप दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांची नावे वगळली जाणे, केवायसी प्रक्रियेतील अडथळे आणि त्यामुळे अनेक महिलांना योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून देण्यात आली. पात्र महिलांना कोणत्याही प्रक्रियात्मक त्रुटींचा फटका बसू नये व त्यांना योजनेचा अखंडित लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प) जिल्हाध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील, मसूद शेख, नगरसेवक बबलूभाई शेख, पंकज भोसले, सर्फराज कुरेशी, एजाज काझी, विशाल शिंगाडे, सुनील आंबेकर, अन्वरभाई शेख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## योजनेचा लाभ मिळाला पाहिजे

सरकार कोणत्याही पक्षाचे असो त्यांनी एकदा जाहिर केलेली योजना बंद किंवा कपात करू नये. यामुळे नाराजी निर्माण होते. आता या बाबत कठोर निर्णयाची गरज आहे. योजना ही निर्माण केली जाते ती जनतेसाठी! जनतेच्या भल्यासाठी! आपले स्वार्थ साध्य झाल्यावर ती बंद कडे वाटचाल करणे योग्य नाही. सध्याला कोणत्याही राज्यातील निवडणुका घ्या. निवडणुक पुर्व ज्या घोषणा केल्या जातात, त्या नंतर पाळल्या जात नाहीत. त्या बाबत निर्बंधही नाहीत किंवा बांधीलही नाहीत. योजना जाहिर केली, निवडूण आलो विसरून गेला. या बाबत जनता काय करू शकेल? काहीच करणार नाही. निवडणुका ह्या दर पाच वर्षांनी होतात. आपल्याकडे लोकशाहीने चालावे लागते. लोकशाहीत चाडेचार वर्ष सहसा कोणी विचारत नाही. ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे सर्वांना माहिती आहे की, निवडणुक पुर्व व निवडणुकानंतर काय व कसे वागावे. मुळात आता अनेक राज्यात लाडकी बहिण योजना जाहिर केली तीच लाभ झाला. काही राज्यात या योजनेत बदल केला नाही. काही राज्यात कात्री लावली जात आहे. याचा परिणाम आगामी काळात दिसून येणार आहे. आगामी काळात सत्ताधाऱ्यावर झालेला परिणाम कळून येणार आहेत. जनतेला हा पक्का पर्याय हवा असतो. तो जर सहज मिळाला तर निश्चितीत बदल अटळ आहे. एक काळ असा होता की, संबंध देशात काँग्रेसची सत्ता होती. सुरवातीला लोकसभेत दोन खासदार होते. आज परिस्थिती पुर्ण विपतरी दिसून येते. तीही डोळ्या देखत दिसून येत आहे. त्यामुळे अगोदर योजना सुरु कराताना कसलीही विचारपुस केली नाही. योजना लागू केली गेली. कोणत्याही बहीणींने योजना चालू करावी अशी विनंती केली नव्हती. जे दिले ते घेतले व ईमानदारी दाखविली. आता काम सरो वैद्य मरो अशी परिस्थिती दिसून येत आहे. ती अयोग्य नाही. मुळात अनेक योजना चालू केल्या जातात त्या बंदही केल्या जातात. या बाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. अनेक योजनांबाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. आज दिड हजारात तसे काय भागते. दररोज पन्नास रुपये म्हणजे काय होते. आता मजुरी सातशे ते हजार रूपये मिळते. तसा विचार केला तर कपात करणाऱ्यापेक्षा घेणाऱ्यांनी विचार केला पाहिजे. पैसे घेणे हे योग्य का अयोग्य आहे. लालचीपनामुळे धोका होवू शकतो. असो सध्याला ऐंशी लाख महिलांना अपात्र ठरविणे म्हणजे आगामी काळात आपल्याच पायावर आपण दगड मारून घेण्यासारखे आहे. त्यामुळे योजनेला कात्री लावुन किंवा कडक नियम लावुन जो कार्यक्रम हाती घेतला आहे तो अयोग्य आहे, या बाबत विचारमंथन होणे अपेक्षित आहे. वास्तविक मदत कोणाला दिली पाहिजे. जे अपंग आहे. वयोवृद्ध आहेत. त्यांचे पालनपोषण कोणी करीत नाहीत. विधवा महिला. जे काहीच करू शकत नाही अशांना मदत जरूर केली पाहिजे. आज अशां लोकांना मदत करणे आवश्यक आहे. सरकार मदत करणार नसेल तर कोण करणार? त्यामुळे ज्यांना गरज आहे, त्यांना मदत केली पाहिजे. सरकारचे धोरण पक्के असावे. औद्योगिक जागा ही उद्योग निर्मिती साठी घेतली असताना तेथे कमर्शियल, ट्युशनचा वापर होतो. तो अयोग्य असून त्यांची पाठराखण होत असेल तर यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही. एक कारखाना म्हणजे उद्योग उभारला तर किमान दहा ते पन्नास जणास रोजगार मिळू शकतो. हाताला काम मिळू शकतो. त्याच ठिकाणी ट्युशन क्लासेस काढले तर एकच मोठे होवून गावकरी बनतो. हे लक्षात घेतले जात नाही. मुळात चुकीच्या बाबी होवू नयेत. ज्यांना गरज आहे. जनतेसाठी लाभदायक आहेत अशा बाबीची योजना निर्माण करून ती लागू केली पाहिजे. जनता ही शहाणी नाही. दिली म्हणून घेते. दुसऱ्या प्रकारे गॅसची किंमत वाढविते. महागाई वाढली जाते. तो पैसा घेतलेला जनतेला परवडेल का? त्यामुळे आम्हाला काहीच नको. दिड हजार देण्यापेक्षा मोफत गॅस सिलेंडर द्या. एक तर धान्य मोफत चालू आहे. आत दिड हजारापेक्षा मोफत गॅस दिले तर योग्य होणार आहे. त्यामुळे ऐंशी हाजार महिलांची नावे वगळण्यापेक्षा या महिलांनी नको म्हटले पाहिजे. असा विचार कोणी करेल असे वाटत नाही. मुळात अनेकांना आपल्या मताचे मुल्य कळाले नाही. मताचे मुल्य होवू शकत नाही. ही बाब जेंव्हा लक्षात येईल. त्यावेळी कळून येईल. त्यामुळे आज जे चालले आहे. तो पाहून शहाणे होणे अपेक्षित आहे. जनतेला काही बाबी कळाल्याच नाहीत. अविचाराचा परिणाम आहे. एकाही महिलांनी आम्हाला दिड हजार नको तर महागाई कमी करा, गॅस टाकी द्या असे म्हटले नाही. वास्तविक कोणताही व्यावसाय करा. जिद्दीने करा. लाजू नका! दररोज पाचशे पासून दिड हजार कमावु शकतो. आपल्या पायावर उभा राहू शकतोत. मात्र ब्रिटीशांनी लाचार बनविण्याची सवय लावली ती परांपरात चालू आहे. ते आपल्यातून जाण्याचे नाव घेंत नाही. हा त्याचा परिणाम आहे. अनेक जणी तुला दिड हजार आले का? याचीच चर्चा करताना दिसून येत होत्या. तुझी केवायसी झाली का? याशिवाय दुसरी चर्चा दिसून येत नव्हती. आता ऐंशी हजार महिलांना रोखले आहे आता काय करणार? हक्काचे असल्यास भांडता येते. ते दिलेले आहे. त्यामुळे गप्प बसल्याशिवाय दुसरा पर्याय दिसून येत नाही. सरकारने द्यावे मात्र गरजवंताना. घेताना घ्यावे लायक असणाऱ्यांनी! तसे होत नाही. आज किती कोटी रुपयाचा घोटाळा दिसून येतो, त्यावेळी दिड हजारा घेत असल्याबाबत लाज वाटणे स्वाभाविक आहे. किती भ्रष्टाचार होत आहे. किती संपत्ती देशाची लुटली जात आहे. शेकडोंच्या घरात कर्मचारी कोट्यावधीची संपत्ती जमविली आहे., घरदार, आलिशान बंगले, करोडोची संपत्तीची चौकशी होत नाही. गैरप्रकार केल्यावर बुलडोझर फिरविले जात नाही मात्र लाडक्या बहिणीची केवायसी म्हणजे चौकशी होते. महिलांनो विचार करा व आगामी निर्णय घ्या. भीख घेण्यापेक्षा कर्तृत्वाने दररोज शंभर रूपये कमविणे स्वाभिमानाचे आहे. स्वाभिमान घान ठेवण्यासाठी कर्तृत्वाने वागणे केंव्हाणे योग्य आहे. या बाबीचा विचार करा. सरकार राज्य-देश चालविते ते आपल्याकडून कर म्हणजे टॅक्स रुपाने घेते व तेच आपल्याला देते. हे चक्र समजुन घ्या...

# शिक्षणाचे नॉमिनलीकरण आणि भारताचे भविष्य...

यंदा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाने इ. १२ वी आणि इ. १० वी चे निकाल वेळेवर लावले. त्यानंतर जवळपास सर्वच महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची लगबग सुरू झाली. ऐन उन्हाळ्याच्या सुट्ट्यात कुटुंबासह कुठेतरी पर्यटन करून यावं या विचाराने अनेक शिक्षकांनी नियोजन केलेले. पण प्रशासनाला पुढील शैक्षणिक वर्षांतील प्रवेशांची लागलेली चाहूल किंवा चिंता व जेमतेम शिक्षकांवर प्रवेशाची जबाबदारी सोपवून आपल्या पर्यटनाचा मार्ग मोकळा करण्याची घाई जवळपास सगळीकडेच दिसून येते. त्यात दिवसागणिक येणारी परिपत्रके चक्रावून सोडणारी असतात. यातच मग बैठकांचे सत्र सुरू होतात. प्रवेश समिती गठीत होते. यात प्रशासनातल्या मर्जीच्या लोकांचा विशेष विचार केला जातो म्हणजे त्यांच्या सुट्ट्यांच्या नियोजनाला धक्का न लावता व मर्जी विरोधातल्यांना कसे गुंतवून ठेवायचे याचे पूर्वनियोजन झालेले असतेच. प्रामाणिक शिक्षक आपल्या प्राधान्यक्रमांमध्ये बदल करतात व प्रवेश समितीत मुकाट्याने काम करतात हा सर्वसामान्य अनुभव आहे. असो...तर प्रवेश समितीचे काम सुरू होते. मग प्रवेश अर्ज तयार करणे, उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या याद्या मिळवणे, महाविद्यालयाची माहिती देणारे बॅनर तयार करणे, प्रवेश माहितीपुस्तिका तयार करणे इ. कामांना वेग येतो. ज्या-त्या महाविद्यालयातील उपलब्ध सोयींनुसार प्रवेश समितीचे टेबल सजवले जातात. विद्यार्थ्यांना स्वतः फोन करून किंवा पालकांना फोन करून महाविद्यालयात बोलावले जाते. एक-दोन दिवसांनी विद्यार्थी व क्वचितच पालकही येतात. त्यांचं समुपदेशन होतं. कोर्सेसची माहिती दिली जाते. फीस स्ट्रक्चर, शिष्यवृत्ती योजना, उपलब्ध सुविधा वगैरे वगैरे सांगून शिक्षकांचा घसा कोरडा होतो. शिक्षक हळूच विचारतो की, आणखी काही शंका आहेत का? तेंव्हा तेवढ्याच निर्विकार चेहऱ्याने विद्यार्थी व संबंधित पालक शिक्षकाला सांगतात की, आम्हाला नॉमिनल डमिशन पाहिजे गोंधळलेल्या अवस्थेत शिक्षक विचारतो, नॉमिनल म्हणजे कसे? तेंव्हा तो विद्यार्थी म्हणतो, मला रेग्युलर क्लासला येता येणार नाही, फक्त डमिशन करेन व नंतर परीक्षेला येईन शिक्षक गोंधळून विचारतो रेग्युलर न येण्याचे काय कारण आहे? तेंव्हा विद्यार्थ्यांचे पालक म्हणतात तो/ती तयारी करत आहे. आता तयारी कशाची, कुठे, कशी आणि कधीपर्यंत इ. प्रश्नांची सरबत्ती होते पण त्या प्रश्नांना जास्त भिक न घालता तुम्ही फक्त डमिशन द्या गुरूजी नॉमिनल असे म्हणून पालक आपल्या पाल्याला बाजूला सारतात.

नॉमिनल डमिशन हा शब्द तसा कोव्हिड प्रादुर्भावानंतर जास्त प्रचलित झाला. कोव्हिडमध्ये एकमेकांच्या संपर्कात आल्याने विषाणूचा संसर्ग व्हायचा. त्यामुळे सोशल डिस्टन्सिंग सारखे शब्द अगदी मराठी शब्दकोशातले वाटू लागले. त्यामुळेच कदाचित सध्याचे काही विद्यार्थी व पालक अजूनही सोशल डिस्टन्सिंग मध्येच खुश आहेत. मुळात रोजगारांचा अभाव, वाढती तीव्र स्पर्धा, वाढती उदासीनता व मोबाईलमुळे तरूणांमध्ये आलेला एकलकोंडेपणा इ. अनेक कारणांमुळे प्रत्यक्ष वर्गात येऊन शिकण्याची ओढ कमी होत आहे. आमच्या काळात आम्ही नॉमिनल डमिशन या संकल्पनेचा विचारही केला नसता. कारण रोजगार वगैरे पुढचा भाग पण वर्गात भेटणारे शिक्षण, भेटणारे शिक्षक, मित्र-मैत्रिणी, विविध मार्गदर्शकांचे विचार ऐकून येणारी समज आणि शिक्षणातील मज्जा याची जागा कुणी घेऊ शकत नाही. बदलत्या काळात विद्यार्थ्यांनी समाजात मिसळून शिक्षणाचा परिपूर्ण वापर करून आपला उत्कर्ष करून घेण्याची गरज असताना विद्यार्थी त्याच्या उलट वर्तन करत आहेत असे दिसते. अर्थात हे सर्वच विद्यार्थ्यांबद्दल लागू होत नाही. परंतू शिक्षणाचे असे नॉमिनलीकरण होत गेले तर शिक्षणाचा मुख्य उद्देशच हरवून जाईल अशी भिती अनेक शिक्षणतज्ञ व्यक्त करत आहेत.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो ते पील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठासून सांगितले आहे. परंतू भविष्यात शिक्षणाचे नॉमिनलीकरण झाले तर एक वैचारिकदृष्ट्या पंगू व अकार्यक्षम समाज तयार होईल हे नक्की. आधीच भारतात बेरोजगारांचे प्रमाण प्रचंड आहे त्यात नॉमिनलीकरणातून तयार झालेल्या पिढीचे ओझे वाढत गेल्यास अराजकता माजेल. या सर्व बाबींचा विचार करून शिक्षणतज्ञांना व शासनाला उपाययोजना कराव्या लागतील. प्रकाशाच्या वेगाने वाढणारे तंत्रज्ञान व तितक्याच झपाट्याने वाढत चाललेली शिक्षणातील उदासीनता अंतर्मुख करणारी आहे. कुठेतरी काहीतरी फंडामेंटल गडबड होत आहे. ती रिसेट करून पुन्हा शिक्षणाचे नॉर्मलायझेशन करण्याची नितांत आवश्यकता आहे हे अधोरेखित होत आहे.

**लेखक**
**- डॉ. नरेश पिनमकर**
**(लेखातील विचार वैयक्तिक असून त्याचा कुणाशीही संबंध नाही)**

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्र देशात टॉपर




**मुंबई/प्रतिनिधी :** छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत दि. २९ मे रोजी देशात आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक १५ हजार घरांवर प्रकल्प बसविण्यात आले असून त्यापैकी ४,७०० घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी महाराष्ट्राचे अभिनंदन केले असून राज्याने ६ लाखापेक्षा अधिक घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या निवडक राज्यांच्या गटात प्रवेश केल्याबद्दलही कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीने वेग घेतला आहे. मे महिन्यात योजनेसाठी सादर अर्जांमध्ये देशात प्रथम क्रमांक, प्रकल्प बसविलेल्या एकूण घरांमध्ये दुसरा क्रमांक, प्रकल्पांच्या तपासणीमध्ये पहिला क्रमांक आणि पुरवठादारांच्या नोंदणीमध्ये दुसरा क्रमांक अशा रितीने या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या पाच टॉपर राज्यांमध्ये समाविष्ट झाला आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात महावितरणमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. या यशाबद्दल राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती वीज ग्राहकांना घराच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी थेट अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. या योजनेच्या अंमलबजावणीत वीज ग्राहकांकडून अर्जांची स्वीकृती, प्रत्यक्ष प्रकल्प बसविणे आणि त्याची तपासणी करून तो सुरू करणे हे तीन महत्त्वाचे टप्पे असतात. मे महिन्यात या योजनेसाठी देशभर विशेष अभियान चालविण्यात आले होते त्यामध्ये महाराष्ट्र राज्य टॉपर ठरले आहे.

योजनेसाठी मे महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये ४ लाख ४९ हजार अर्जांसह महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. गुजरात (३ लाख), उत्तर प्रदेश (१ लाख), राजस्थान (४४ हजार) व केरळ (३५ हजार) या राज्यांचा महाराष्ट्रानंतर क्रमांक लागतो.

छतावर सौरऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य ५४ हजार प्रकल्पांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. याबाबतीत उत्तर प्रदेश (६४ हजार), गुजरात (३५ हजार), राजस्थान (२६ हजार) व केरळ (२० हजार) ही अन्य राज्ये टॉप पाच राज्यांमध्ये आहेत.

छतावर बसविलेले सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प तपासण्याच्या बाबतीही महाराष्ट्र राज्य ६९ हजार प्रकल्पांसह पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (६४ हजार), गुजरात (४२ हजार), राजस्थान (२७ हजार) व केरळ (१८ हजार) ही राज्ये महाराष्ट्रानंतर टॉप पाचमध्ये समाविष्ट आहेत.

छतावर सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्याचे काम नोंदणीकृत कंत्राटदारांमार्फत केले जाते. ग्राहकाला आपल्या पसंतीप्रमाणे कंत्राटदार निवडता येतो. कंत्राटदारांच्या नोंदणीमध्ये ४१३ कंत्राटदारांसह महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (७७९), गुजरात (२१०), आसाम (१८१) व राजस्थान (१७७) ही सर्वोच्च कामगिरीच्या पाचपैकी अन्य राज्ये आहेत.

# रायगडावरील सुविधांची सामूहिक पाहणी करून व्यापक आराखडा ठरविणार : मंत्री ॲड. आशिष शेलार



**मुंबई/प्रतिनिधी :** रायगड किल्ला परिसरातील विकासकामे, जनसुविधा, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा, रायगड किल्ल्याचे जतन व संवर्धन तसेच रायगड विकास प्राधिकरणाच्या कार्यप्रणालीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी संयुक्त स्थळ पाहणी करावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिले.

रायगड किल्ला विकास पर्यटन आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचा मंत्री ॲड.शेलार यांनी मंत्रालयात आढावा घेतला. यावेळी रायगड किल्ला विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती (दूरदृश्य प्रणालीद्वारे), सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, महसूल विभागाचे उपसचिव संजय धारूरकर, सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, उपसचिव महेश वाव्हळ, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ.तेजस गर्गे तसेच रायगड जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, भारतीय पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत रायगड किल्ल्यावर सुरू असलेल्या जतन संवर्धन व विकासकामांची माहिती देण्यात आली. शिरकाई मंदिर, महादरवाजा आणि वाघ दरवाज्याच्या संवर्धनाची कामे सुरू असून राणी वसाहतीचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले. तसेच हत्ती तलाव व फुटका तलाव परिसरातील गाळ काढणे आणि गळती रोखण्याची कामेही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर, रायगडावरील स्वच्छतागृहे, त्यांची देखभाल आणि पाणीपुरवठा यासंदर्भातील प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावर मंत्री ॲड . शेलार यांनी पुरातत्व विभाग, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय), जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदार यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वस्तुस्थितीचा अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले. या पाहणीनंतर लवकरच मंत्रालयात एक बैठक घेऊन रायगड विकास प्राधिकरणाची स्वायत्तता, उपलब्ध निधी, देखभाल व्यवस्था, जनसुविधांचे व्यवस्थापन आणि विविध विभागांमधील जबाबदाऱ्या यावर व्यापक चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

# 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेच्या अंकाचे सचिव आप्पासो धुळाज यांच्या हस्ते प्रकाशन



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेच्या मे २०२६ या अंकाचे प्रकाशन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव तथा अतिथी संपादक आप्पासो धुळाज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव (मावज) अजय भोसले, कक्ष अधिकारी प्रशांत वामन, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभागाचे सल्लागार कार्तिक पांडे आदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

'आपलं मंत्रालय'च्या नव्या अंकामध्ये विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीतील तंत्रज्ञान, सामाजिक संवेदनशीलता आणि सर्वसमावेशक विकासाचा वेध घेण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम तंत्रज्ञान, आरोग्य, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि ग्रामीण विकास यांसारख्या विविध विषयांचा समावेश या अंकात करण्यात आला आहे; तसेच सांस्कृतिक, भावनिक आणि मानवी मूल्यांना स्पर्श करणारे लेखही वाचकांसाठी विशेष आकर्षण ठरणारे आहेत.

मंत्रालयातील विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने गृहपत्रिका प्रकाशनाचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एअर इंडिया इमारत करारनाम्याचे हस्तांतरण



**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्रालयाजवळील एअर इंडिया इमारत राज्य शासनाने खरेदी केली आहे. एअर इंडिया सेट होल्डिंग कंपनी आणि राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील करारनाम्यांचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर मंत्रिमंडळ सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, एअर इंडिया कंपनीचे वाणिज्य अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ ला गती ३५०० किलोमीटर रस्त्यांसाठी ६ हजार ४२९ कोटींना मंजुरी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामीण संपर्क व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ अंतर्गत आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँक (एआयआयबी) च्या अर्थसहाय्याने सुमारे ३,५०० किलोमीटर लांबीचे रस्ते व पुलांच्या कामांसाठी ६,४२९ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

या योजनेसाठी एआयआयबीकडून सुमारे ५०० दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सुमारे ४,५०० कोटी रुपये) कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध होणार असून, राज्य शासनाकडून ३० टक्के हिस्सा म्हणून सुमारे २१५ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सुमारे १,९२९ कोटी रुपये) उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या प्रकल्पांतर्गत ग्रामीण मार्ग आणि इतर जिल्हा मार्गांच्या दर्जोन्नतीची कामे करण्यात येणार आहेत. सविस्तर प्रकल्प अहवालानुसार निश्चित होणाऱ्या खर्चाच्या अधीन राहून सुमारे ३,५०० किलोमीटर लांबीचे रस्ते व पुलांची कामे हाती घेण्यात येतील.

एआयआयबीकडून प्राप्त होणाऱ्या कर्जाची मूळ रक्कम आणि त्यावरील व्याजाची परतफेड राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येणार आहे. या कर्जाची परतफेड ५ वर्षांच्या वाढीव कालावधीसह (ग्रेस पिरियड) एकूण २५ वर्षांत केली जाणार आहे.

प्रकल्पाच्या आर्थिक व्यवस्थापनासाठी बाह्य हिस्सा (७० टक्के) आणि राज्य हिस्सा (३० टक्के) यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. तसेच एआयआयबीकडून निधी प्राप्त होईपर्यंत प्रगतीपथावरील कामांचा खर्च राज्य निधीतून करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ साठी मंजूर करण्यात आलेल्या लांबीपैकी राज्य निधीतून स्वतंत्रपणे २,५०० किलोमीटर लांबीची रस्त्यांची कामे हाती घेण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होणार असून शेतीमालाची वाहतूक, शिक्षण, आरोग्य सेवा, बाजारपेठांपर्यंत पोहोच आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

# शिक्षण संस्थाचालक, प्राचार्य व गुणवंतांचा ऐतिहासिक 'लातूर पॅटर्न'च्या आठवणींसह गौरव!

## लोकनेते विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त विनायकराव पाटील यांच्याकडून अनोख्या उपक्रम

**लातूर प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व लोकनेते स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंती निमित्त शहरात विविध सामाजिक आणि आगळ्यावेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विलासराव देशमुख साहेबांचे येथील आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासातील, विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. श्री. विनायकराव पाटील कवठेकर यांनी जयंतीचे औचित्य साधून जनहिताचे आणि समाजोपयोगी उपक्रम राबवत साहेबांच्या स्मृतींना एका विशेष व आगळ्यावेगळ्या पद्धतीने उजाळा दिला. या जयंतीनिमित्त तुलसी हॉलमध्ये, या परिसराला 'शैक्षणिक पंढरी' बनवणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध शिक्षण संस्थाचालक, प्राचार्य आणि गुणवंतांचा विशेष गौरव करण्यात आला. शिक्षणाच्या क्षेत्रात संपूर्ण देशभरात जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणारा 'लातूर पॅटर्न' आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख साहेबांचे एक अत्यंत जवळचे आणि ऐतिहासिक नाते राहिले आहे. या मातीचे सुपुत्र



असलेल्या विलासराव देशमुख साहेबांनी या शैक्षणिक चळवळीला मोठे राजकीय आणि प्रशासकीय बळ दिले. विलासराव देशमुख साहेबांच्या याच दूरदृष्टीमुळे आज हे शहर स्पर्धा परीक्षा,छएएढ, गएए आणि उच्च शिक्षणासाठी देशातील एक प्रमुख केंद्र बनले आहे. या परिसराला शिक्षणाचे माहेरघर बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या साहेबांनी या यशाचे श्रेय नेहमीच तिथल्या शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या कष्टाला दिले.

लातूर शहराच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी विनायकराव पाटील यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. त्यानंतर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी सध्याच्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या असलेल्या 'नीट' (छएएढ) पेपर फुटीच्या प्रकरणावर आपले परखड मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा हा खेळ थांबवण्यासाठी आणि परीक्षेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी या समस्येकडे गांभीर्याने पाहणे किती गरजेचे आहे, याकडे त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लातूरच्या शैक्षणिक परंपरेची जपणूक करण्यावर भर दिला. लातूरचा लौकिक वाढवण्यात महत्त्वाचा वाटा असलेल्या दयानंद व शाहू शिक्षण संस्थेसारख्या पवित्र विद्या मंदिरांना आणि त्यांच्या प्रतिमेला कोणत्याही कारणाने कधीही गालबोट लागू नये, यासाठी संपूर्ण शैक्षणिक वर्गाने अत्यंत दक्ष आणि कटिबद्ध राहिले पाहिजे, अशी भावना त्यांनी या वेळी व्यक्त केली.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी यांनी आपले मत मांडताना लातूरमधील संस्थांच्या दर्जेदार कामगिरीचा गौरव केला. येथील शैक्षणिक संस्थांचे कार्य अत्यंत आदर्श व चोख असून 'नीट' आणि 'जेईई' सारख्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीमध्ये लातूरने नेहमीच भरीव, यशस्वी व उल्लेखनीय काम केले असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले. याच ऐतिहासिक शैक्षणिक वारशाचा सन्मान करण्यासाठी तुलसी हॉलमध्ये आयोजित केलेल्या शानदार सोहळ्यात, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. अनिरुद्ध जाधव यांचा सत्कार शहराच्या महापौर जयश्रीताई सोनकांबळे आणि विनायकराव पाटील कवठेकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव श्री.रमेश बियाणी यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. विनायकराव पाटील यांनी आयोजित केलेल्या या अनोख्या आणि समाजोपयोगी उपक्रमाची उपस्थितांनी उत्स्फूर्त कौतुक केले.

या सोहळ्याला शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव उद्धवराव पाटील, प्राचार्य डॉ. आर.एल. कावळे, ॲड. शहाजी मनाळे, शिवाजीराव भोसले, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, प्रा. डी.के. देशमुख, प्रकाश देशमुख, अमर देशमुख आणि प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, माजी उपप्राचार्य श्री. अनिलकुमार माळी यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणींना उजाळा देत आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात, वेगळ्या पद्धतीने आणि यशस्वीपणे संपन्न झाला.

# मुरुड पारुनगर जिल्हा परिषद शाळेस इयत्ता नववीची तुकडी मंजूर

*धिरज विलासराव देशमुख यांनी वाढीव तुकडीसाठी घेतला होता पुढाकार,विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण*



**मुरुड/प्रतिनिधी:** लातूर तालुक्यातील मुरुड येथील पारुनगर जिल्हा परिषद शाळा ही ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये उत्कृष्ट शिक्षणासाठी ओळखली जाते. या प्रशालेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी सातत्याने विशेष प्रयत्न केले आहेत.

यापूर्वी प्रशालेतील सेमी इंग्लिश विभागातील सातवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी इयत्ता आठवीची अतिरिक्त तुकडी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामार्फत विशेष बाब म्हणून धिरज विलासराव देशमुख यांनी मंजूर करून घेतली होती. त्याच अनुषंगाने यावर्षी इयत्ता आठवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता नववीची तुकडी मंजूर होणे आवश्यक होते. मात्र फेब्रुवारी २०२६ पर्यंत नववीची तुकडी मंजूर नसल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये पुढील शिक्षणाबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

ही बाब शालेय प्रशासन, व्यवस्थापन समिती व स्थानिक काँग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी यांनी मा. धिरज विलासराव देशमुख व मा. अमित विलासराव देशमुख यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर पंचायत समितीचे उपसभापती यांच्या माध्यमातून गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडील प्रस्ताव तातडीने जिल्हा परिषद प्रशासनाकडे पाठविण्यात आला.

माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख व धिरज विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव डॉ. दिनेश नवगिरे यांनी जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी मा. तृप्ती अंधारे यांची भेट घेऊन या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर प्रशासकीय स्तरावर या प्रस्तावाला गती मिळाली.

या पाठपुराव्याला यश मिळून शिक्षण विभागाने मुरुड पारुनगर प्रशालेस इयत्ता नववीची तुकडी मंजूर केली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला असून पालक, विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निर्णयाबद्दल विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख, जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी मा. तृप्ती अंधारे तसेच संबंधित शिक्षण विभागाचे आभार व्यक्त केले आहेत.

# चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या प्रवचनमालेचे आयोजन



**लातूर प्रतिनिधी:** श्रीसद्गुरु सेवा समिती लातूरच्या वतीने ह भ प चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या तिन दिवसाच्या प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीसद्गुरु चैतन्य महाराज हे राजा हरिश्चंद्राची कथा सांगणार आहेत. सावेवाडीतील शाम मंगल कार्यालयात ५ जुन ते ७ जुन सांयकाळी सहा या वेळेत कथा होणार आहे. चैतन्य महाराज यांची आयोध्येत ९ दिवसाची श्रीराम कथा यशस्वी झाली आहे . त्या कथेला लातूर जिल्ह्यातुन मोठ्या संख्येने भाविक गेले होते. रामायण, महाभारत, शास्त्र, पुराण यांचा सुरेख संगम आणि त्याची सुसंगत मांडणी करीत चैतन्य महाराज हे विषयाला न्याय देत असतात. अधिक मास आणि दानशुर अशा राजाची कथा ऐकण्याची सुवर्णसंधी लातूरकराना लाभत आहे. त्याचा लाभ सर्वांनी प्रामुख्याने तरुण वर्गाने घ्यावा असे अवाहन दिवाण परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोलापूर विभागाने रेल्वेच्या भविष्यातील गरजांसाठी महत्त्वपूर्ण OHE सुधारणा कार्य हाती घेतले; सोलापूर यार्डातील नवीन ROB बांधकामालाही येणार गती

**लातूर प्रतिनिधी:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने, सोलापूर यार्डातील नवीन 'रोड ओव्हर ब्रिज' (ROB) च्या बांधकामाच्या अनुषंगाने, 'ओव्हरहेड इक्विपमेंट' (OHE) मध्ये सुधारणा करण्याचे एक व्यापक कार्य हाती घेतले आहे. १४ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर यार्डातील १०३ वर्षे जुना ठजइ यशस्वीरित्या पाडल्यानंतर, 'भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा'ने (NHAI) नवीन पुलाच्या बांधकामाला सुरुवात केली. या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पाला गती देण्यासाठी आणि रेल्वेचे कामकाज सुरक्षितपणे सुरू राहावे यासाठी, सोलापूर विभागाच्या 'इलेक्ट्रिकल ट्रॅक्शन डिस्ट्रिब्युशन' (TRD) विभागाने सोलापूर स्टेशन यार्डाच्या बाधित क्षेत्रात विद्यमान जक्ए जाळ्यामध्ये (नेटवर्कमध्ये) बदल करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हाती घेतले आहे.

जुन्या पुलाच्या रचनेखाली असलेल्या जक्ए ला, पुलाच्या रचनेपासून तसेच त्याखालून धावणाऱ्या गाड्यांपासून 'इलेक्ट्रिकल क्लिअरन्स'च्या (विद्युत अंतराच्या) संदर्भात गंभीर मर्यादा होत्या. परिणामी, या विभागात जक्ए ची एक विशेष रचना तयार करण्यात आली होती. नवीन ठजइ चे बांधकाम सध्या प्रगतीपथावर असल्याने, विभागाने या विशेष रचनेचे रूपांतर एका 'पारंपारिक जक्ए प्रणाली'मध्ये करण्यास सुरुवात केली आहे. या बदलामुळे गाड्यांचा वेग वाढवणे शक्य होईल, इलेक्ट्रिकल क्लिअरन्समध्ये सुधारणा होईल आणि रेल्वेच्या कामकाजाची सुरक्षा लक्षणीयरीत्या वाढेल.

अतिशय काटेकोर नियोजन आणि सखोल समन्वयानंतर, २२ मे २०२६ रोजी या कामाला सुरुवात झाली. सोलापूरमधून जाणाऱ्या मुंबई-चेन्नई या अत्यंत व्यस्त आणि 'सुवर्ण चतुष्कोण' मार्गाचे (Golden Quadrilateral route) धोरणात्मक महत्त्व लक्षात घेता, रेल्वेच्या कामकाजात किमान व्यत्यय







येईल अशा पद्धतीने हे काम पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या महत्त्वपूर्ण कामाची अंमलबजावणी जलदगतीने करण्यासाठी, 'ब्लॉक'च्या (कामासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या) कालावधीत सुमारे ३० कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या चार विशेष पथकांना, दोन 'टावर वॅगन्स' आणि एका 'रेल क्रेन'सह सतत कामावर तैनात करण्यात आले आहे. कडाक्याच्या उन्हाळ्याची आणि उष्ण हवामानाची पर्वा न करता, ही पथके आपापसांत निकटचा समन्वय साधून आणि 'मिशन मोड'वर (युध्दपातळीवर) काम करत आहेत, जेणेकरून जक्ए मधील बदलांचे हे काम निर्धारित वेळेत पूर्ण करता येईल.

या प्रकल्पात अभियांत्रिकी क्षेत्रातील काही महत्त्वपूर्ण आव्हानांवर मात करणे देखील समाविष्ट होते. कामाच्या ठिकाणी असलेला एक OHE 'पोर्टल' (खांब), प्रस्तावित ठजइ च्या 'गर्डर'च्या रेषेत (alignment) अडथळा निर्माण करत होता; तसेच या पोर्टलचे पाया (foundations) देखील प्रस्तावित 'पियर कॉलम'च्या पायांच्या रेषेत अडथळा ठरत असल्याचे निदर्शनास आले होते. रेल्वे प्रशासनाने या महत्त्वपूर्ण मालमत्ता वेळेवर हटवण्याचे आणि त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे नियोजन यशस्वीरित्या आखले व त्याची अंमलबजावणी केली; ज्यामुळे NH-I ला नियोजित वेळापत्रकानुसार पुलाच्या बांधकामाचे कार्य पुढे नेणे शक्य झाले. सध्या सुरू असलेले OHE (ओव्हरहेड उपस्कर) ची उंची वाढवण्याचे आणि त्यामध्ये सुधारणा करण्याचे काम, महत्त्वपूर्ण सार्वजनिक पायाभूत सुविधांची उभारणी करताना रेल्वे आणि महामार्ग प्राधिकरणांमध्ये असलेल्या निकटच्या समन्वयाचे उत्तम उदाहरण आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर, अद्ययावत झालेली जक्ए प्रणाली सोलापूर विभागातील रेल्वेच्या परिचालन सुरक्षेत वाढ करेल, सेवेची विश्वासार्हता सुधारेल आणि सोलापूरमार्गे होणारी रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत करण्यास मदत करेल. त्याच वेळी, यामुळे सोलापूर यार्ड येथील नवीन ठजइ (रेल्वे ओव्हर ब्रिज) च्या बांधकामालाही गती मिळेल. हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून, यामुळे शहरी वाहतूक सुलभ होईल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि सोलापूरच्या रहिवाशांसाठी रस्ते जोडणी अधिक बळकट होईल अशी अपेक्षा आहे.

रेल्वे प्रवासी आणि सर्वसामान्य जनतेला किमान त्रास होईल याची काळजी घेत असतानाच, पायाभूत सुविधांचे प्रकल्प सुरक्षितपणे, कार्यक्षमतेने आणि वेळेवर पूर्ण करण्यासाठी सोलापूर विभाग कटिबद्ध आहे. सोलापूर यार्ड ROB प्रकल्प हा या विभागासाठी अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि भविष्यासाठी सज्ज असे वाहतूक जाळे निर्माण करण्याच्या दिशेने मध्य रेल्वेने केलेल्या प्रयत्नांचेच प्रतिबिंब आहे.

# दयानंद विज्ञानला अकरावीच्या पहिल्या फेरी प्रवेशासाठी विद्यार्थी व पालकांची प्रचंड गर्दी

**लातूर प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीचे प्रवेश दि. २९ मे २०२६ पासून सुरू झाले असून उद्या दि.०३ जून २०२६ ही शेवटची तारीख आहे.पहिल्या फेरीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी दयानंद विज्ञान महाविद्यालयात पालक व विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी असून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतला आहे. तसेच दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळावा म्हणून प्राधान्य क्रमांक निवडण्यासाठी व इतर माहितीसाठी महाविद्यालयास विनंती केली आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप ऑनलाईन पद्धतीमध्ये प्रवेश नोंदणी





केलेली नाही, अशा विद्यार्थ्यांनीही दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी महाविद्यालयाकडे संपर्क साधलेला असून प्रवेश समितीद्वारे त्यांना मार्गदर्शन केले जात आहे.ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले आहेत त्या सर्व विद्यार्थ्यांसाठी तात्काळ महाविद्यालयांमध्ये तासिका सुरू करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे आणि त्याबाबतीत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात आलेले आहे.दुसऱ्या यादीत गुणवत्तेनुसार दयानंद विज्ञान महाविद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी पालक, विद्यार्थी आग्रही आहेत.त्याचे मुख्य कारण म्हणजे दयानंद विज्ञान महाराष्ट्रातील एक नामवंत कॉलेज असून जेईई ,सीईटी व नीटचा उत्कृष्ट निकाल देणारे एकमेव महाविद्यालय आहे.

# संघर्षपिटक आत्मचरित्राचा विश्वजीत प्रतिष्ठान कडून प्रकाशन सोहळा संपन्न

**लातूर प्रतिनिधी:** विश्वनीत प्रतिष्ठान लातूर यांच्या वतीने पंथर ते रिपब्लिकन चळवळीतील अग्रेसर असलेले श्रीहरी नरहरी कांबळे यांच्या कथनातून श्रीहरी कांबळे लिखीत संघर्षपिटक आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा विश्वजीत प्रतिष्ठान लातूर यांच्या वतीने भालचंद्र ब्लड बैंक या ठिकाणी संपन्न करण्यात आला. या सोहळयासाठी कार्यक्रमाची अध्यक्ष प्रा. डॉ. सुरेशजी बाघमारे, प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ. दुष्यंतमी कठारे, प्रा. डॉ. जयद्रवनी जाधव, प्रमुख पाहुणे ॲड. बळवंतमी जाधव, ॲड. वैभवानी सुर्यवंशी, पेंथर नेते श्रीहरी कांबळे व सौ. सुरेखा श्रीहरी कांबळे उपस्थित होते.प्रकाश सोहळा हा कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्याहस्ते संपन्न झाला. यावेळी प्राचार्य दुष्यंतजी कठारे यांनी पुस्तकावर व लेखकावर संभाषण केले, त्याच बरोबर प्रमुख पाहुणे ॲड. बळवंतभी जाधव यांनी पंचरनी केलेल्या कार्याची माहिती दिली व तो काळ किती संघर्षाचा होता यावर टिप्पणी केली व प्रकाश सोहळ्यास शुभेच्छा दिल्या. यानंतर पैघरचे नेते श्रीहरी कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. जयद्रथजी जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना पुस्तकावर व लेखकावर योग्य ती टिप्पणी





केली. पैथर काळात ज्या कार्यकत्यांनी लेखकाच्या सोबत काम करत होते त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्तावित प्रा. युवराज अंधोरिकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या वेळी काही कार्यकत्यांनी पैचर नेते श्रीहरी कांबळे यांचा सत्कार केला व प्रकाशन सोहळ्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी वंचितचे नगरसेवक इंजि. सचिन गायकवाड, युथ पंचर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोषणी वाघमारे, प्रताप कांबळे, सिध्दार्थ कवठेकर, नागरत्न कांबळे, अमोल बनसोडे, अमित कांबळे, दयानंद कांबळे, आनंद सुरवसे, प्रा. हिराचंद सितापुरे, किशोर वाघमारे, ॲड. संजय पैठणे, नारायण सुर्यवंशी आदि लातूर जिल्हयातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. गाडे सर व आभार प्रा. विनोद टेकाळे यांनी मांडले, कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. युवराज अंधोरिकर, प्रसेनजित कांबळे, संजय सुरवसे, सचिन हिंगे, अमोल शिंदे, दत्तात्रय गायकवाड, सिताराम कांबळे, साहिल कांबळे, इंद्रप्रस्थ कांबळे, सिध्दांत मस्के, प्रतिक कांबळे, अतूल काळे, यशपाल कांबळे, अऋतुराज टेकाळे, संदिप साप्ळचे, तुषार आल्टे, ऋषिकेश कांबळे, निखील कांबळे आदीन परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.





शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# विजय गायकवाड सन्मानित



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- दलित पँथर चळवळीतील एक शिलेदार श्रीहरी कांबळे यांनी संघर्ष पिठक नावाचे आत्मचरित्र लिहिले आहे. या पुस्तकास प्रसिध्द विचारवंत प्रा. डॉ. सुरेश वाघमारे यांनी प्रास्तावना लिहिली आहे. महाराष्ट्रातील प्रसिध्द विचारवंत यशवंत मनोहर यांनीही पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त केले आहे. भालचंद्र ब्लड बँक लातूर येथे दि. ३१/०५/२०२६ रोजी झालेल्या या पुस्तक प्रकाशन सोहळयानिमित्त दलित पँथर भारतीय विद्यार्थी संसदेच्या माध्यमातून श्रीहरी कांबळे यांच्याबरोबर कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक श्री. व्ही.एस. गायकवाड यांचा महाराष्ट्रातील प्रसिध्द विचारवंत प्राचार्य प्रा. डॉ. सुरेश वाघमारे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कठारे, प्रा. डॉ. जयद्रथ जाधव, ड. बळवंत जाधव, वैभव सुर्यवंशी यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व संघर्ष पिठक पुस्तक देवून सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी पुस्तकाचे लेखक श्रीहरी कांबळे, सौ. सुरेखा कांबळे, प्रा. आनंत लांडगे, चंद्रकांत चिकटे, प्रविण सोमठाणकर, मोहन माने, विश्वंभर भोसले, विलास सुर्यवंशी, ड. राजेंद्र लातूरकर, प्रा. डॉ. गौतम टेकाळे, श्रीहरी कांबळे, विश्वजीत प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. श्री. गायकवाड यांच्या या सन्मानाबद्दल मित्र परिवारातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# दारूमुक्तीच्या घोषणा हवेत... धाराशिवच्या मातीत हातभट्ट्यांचे साम्राज्य!

धाराशिव (शेख अंजुम)- महाराष्ट्र शासन कोट्यवधी रुपये खर्च करून व्यसनमुक्ती अभियान राबवत आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून दारूबंदीचे संदेश दिले जात आहेत. मात्र दुसरीकडे धाराशिव जिल्ह्यातील वास्तव याच्या अगदी विरुद्ध असल्याचे चित्र समोर येत आहे. जिल्ह्यातील तब्बल ७३४ गावांमध्ये दीड हजारांपेक्षा अधिक हातभट्टी दारूचे अड्डे सुरू असल्याची चर्चा असून गावोगावी अवैध दारूचे जाळे इतके मजबूत झाले आहे की आता हा व्यवसाय उघडपणे चालवला जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा, कळंब, भूम, परंडा, लोहारा, वाशी, नळदुर्ग, मुरूम आणि ग्रामीण भागातील अनेक वस्त्या, तांडे व वाड्यांमध्ये हातभट्टी दारूची निर्मिती मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्याच्या बातम्या येतात, पण काही दिवसांतच त्याच ठिकाणी पुन्हा धुराडे पेटलेली दिसतात.

**कारवाई की फक्त दिखावा?**

राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिस प्रशासनाकडून वेळोवेळी छापे टाकले जातात. काही ड्रम जप्त होतात, काही लिटर दारू नष्ट केली जाते आणि काही आरोपींवर गुन्हे दाखल होतात. मात्र ही कारवाई अवैध धंदे कायमचे बंद करण्यासाठी आहे की फक्त आकडेवारी वाढवण्यासाठी, असा प्रश्न आता सामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे.

अनेक गावांतील नागरिकांचे म्हणणे आहे की, अधिकारी येतात, फोटो काढतात, पंचनामा करतात आणि निघून जातात. काही दिवसांनी पुन्हा त्याच ठिकाणी दारूचा व्यवसाय सुरू होतो. त्यामुळे या संपूर्ण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**तरुणाईचा विनाश सुरूच**

हातभट्टी दारूचे सर्वात मोठे दुष्परिणाम ग्रामीण भागातील तरुणांवर होत आहेत. अत्यंत कमी किमतीत उपलब्ध होणारी ही दारू अनेक युवकांना व्यसनाच्या गर्तेत ढकलत आहे. अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. घरगुती हिंसाचार, भांडणे, मारामाऱ्या, चोरी, आर्थिक संकटे आणि सामाजिक अधःपतन यामागे हातभट्टी दारू मोठे कारण ठरत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सांगतात.

अनेक गावांमध्ये महिलांनी हातभट्ट्यांविरोधात आंदोलन केले, मोर्चे काढले, निवेदने दिली; पण काही दिवसांनंतर परिस्थिती पुन्हा जैसे थे होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

**महसुलाला कोट्यवधींचा फटका**

अवैध दारू व्यवसायामुळे शासनाच्या महसुलाला मोठा फटका बसत आहे. अधिकृत मद्यविक्री केंद्रांऐवजी हातभट्टी दारूचा वापर वाढल्याने उत्पादन शुल्क विभागाला कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. त्यामुळे शासनाचा महसूल बुडत असताना संबंधित विभागाकडून ठोस कारवाई का होत नाही, हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

**हातभट्टीच्या मागे कोणाचे आशीर्वाद**

जिल्ह्यात एवढ्या मोठ्या प्रमाणावर हातभट्टी दारूची निर्मिती व विक्री सुरू असताना संबंधित विभागांना याची माहिती नाही, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. त्यामुळे या संपूर्ण अवैध साखळीच्या मागे कोणाचे राजकीय, आर्थिक किंवा प्रशासकीय संरक्षण आहे का, याबाबत नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहे.

गावोगावी हातभट्टीचे अड्डे सुरू असताना त्यांच्यावर कायमस्वरूपी कारवाई का होत नाही? संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित का केली जात नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या अवैध धंद्यामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांचा विचार कोण करणार

धाराशिव जिल्ह्यातील जनतेला आता फक्त छापे नकोत, तर कायमस्वरूपी उपाय हवा आहे. अन्यथा दारूमुक्ती हा शब्द फक्त सरकारी जाहिरातींमध्येच दिसेल आणि गावोगावी हातभट्ट्यांचे साम्राज्य अधिक बळकट होत राहील, अशी तीव्र भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे

# महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याबद्दल पंकज जमादार ,महेश रणखांब व रोहित धनेराव यांचा सत्कार



उमरगा(विजय पिसे)- श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागातील कॅडेट पंकज जमादार,महेश रणखांब याची मुंबई पोलीस पदी निवड झाली. तसेच कॅडेट रोहित धनेराव याची पण मीरा भाईंदर येथे महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड झाली. ही निवड प्रक्रिया नुकतीच जाहिर करण्यात आली यामध्ये महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाची यशाची परंपरा कायम राखण्यात कॅडेटस यशस्वी ठरले.आता पर्यंत अनेक कॅडेटस वेगवेगळ्या क्षेत्रात भरती होत आहेत .या यशिस्वेतेबद्दल प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी त्याचा सत्कार करून पुढील प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या .या सत्कार समयी प्राचार्यांनी मार्गदर्शन केले त्यांनी सर्व यशस्वी कॅडेटसचे मार्गदर्शन घ्यावे व आपणही पुढील वर्षी होणाऱ्या पोलीस भरतीमध्ये यश संपादन करून आपले जीवन सार्थकी लावावे असे त्यांनी आव्हान केले. उमरगा हे तालुक्याचे व ग्रामीण भाग जरी असला तरी यशाची दरवाजे हे येथुनच उघडतात यासाठी महाविद्यालय नेहमी आपणास सर्वोत्तपरी सहकार्य करण्यास बांधिल असेल असे यावेळी अस्वले यांनी प्रतिपादन केले.या सत्कार समयी डॉ पद्माकर पिटले कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले , प्रा गुंडाबापू मोरे ,प्रा शैलेश महामुनी,राजकुमार सोनवणे, नितीन कोराळे प्राध्यापक, कॅडेट्स उपस्थित होते .

# अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी गोपाळ सुरवसे यांची नियुक्ती



धाराशिव (प्रतिनिधी)- अखिल भारतीय सरपंच परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय (बापू) जगदाळे यांनी धाराशिव जिल्हाध्यक्षपदी गोपाळ सत्यवान सुरवसे यांची नियुक्ती केली आहे. या नियुक्तीबद्दल संजय (बापू) जगदाळे यांनी सुरवसे यांचे अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

तुळजापूर तालुक्यातील मुर्टा येथील गोपाळ सुरवसे हे ग्रामविकास, शेती आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांनी मुर्टा-मानमोडी ग्रामपंचायतीचे एक कार्यकाळ सरपंच म्हणून तसेच एक कार्यकाळ उपसरपंच म्हणून यशस्वी नेतृत्व केले आहे.

ग्रामविकासातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना आदर्श सरपंच पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

शेती क्षेत्रातही गोपाळ सुरवसे यांनी विशेष कामगिरी केली आहे. ते आदर्श व प्रगतशील शेतकरी तसेच उत्कृष्ट द्राक्ष बागायतदार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या ७५ एकर शेतीपैकी ६ एकर क्षेत्रातील द्राक्ष बागेतून विक्रमी उत्पन्न मिळवून त्यांनी प्रगत शेतीचा आदर्श निर्माण केला आहे.

अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर जिल्ह्यातील सरपंचांचे प्रश्न, ग्रामविकास, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण आणि ग्रामीण भागातील विकासकामांना गती देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची भावना गोपाळ सुरवसे यांनी व्यक्त केली.

त्यांच्या निवडीबद्दल जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून सामाजिक, राजकीय व ग्रामपंचायत क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी मिलिंद बोरकर निवडणूक निरीक्षक

धाराशिव (जिमाका) -महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणूक -२०२६ अंतर्गत उस्मानाबाद- लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून श्री.मिलिंद बोरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.भारत निवडणूक आयोगाच्या १ जून २०२६ पत्रानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.

भारत निवडणूक आयोग,नवी दिल्ली यांच्या दि.१८ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.त्यानुसार उस्मानाबाद- लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून श्री.मिलिंद बोरकर (भा.प्र.से.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मतदारसंघाशी संबंधित बाबींकरिता त्यांच्याशी मोबाईल क्रमांक ९९३०९९८९६९ वर संपर्क साधता येणार आहे.निवडणूक निरीक्षक श्री.मिलिंद बोरकर यांच्या राहण्याची व्यवस्था धाराशिवजवळील शिंगोली येथील सर्किट हाऊसमध्ये करण्यात आली आहे.

# भूम तालुक्यात महिला बचत गटाच्या वतीने प्रतिमापूजन: पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जीवनकार्याचा जागर



भूम (प्रतिनिधी)- शहरातील विद्यानगर येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला बचत गटाच्या वतीने जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सुवर्णा संजीवन खांडेकर यांच्या हस्ते राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय मनोगतात सुवर्णा खांडेकर यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. कार्यक्रमात शंकरराव पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुराधा जगदाळे यांनी अहिल्यादेवींच्या कार्याचा इतिहास उलगडून सांगत त्यांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय व दूरदृष्टीच्या प्रशासनाचा आढावा घेतला.

यावेळी सचिव पुष्पा डोंबाळे, डॉ. ऋतुजा बरकडे, डॉ. साक्षी सोन्नर, डॉ. शुभांगी खांडेकर, सुवर्णमाला कांबळे, सुनिता मासाळ, जानकी बरकडे, वनिता अर्जुन, ज्योती सुपनर, इंदू सोन्नर, पार्वती देवकते, ताई तोडकर, गंगा ठाकरे, सुजाता गायकवाड, लक्ष्मी खांडेकर, रूपाली तोडकर, आकांक्षा खांडेकर, पूजा मारकड, मृणाली अर्जुन, मैथली मोटे, सरोजिनी मोटे, उद्योजिका अर्चना साबळे, सोनगिरीच्या सरपंच निर्मला मारकड, सुशीला खांडेकर, अंजली खांडेकर, सुलन हाके, मोनिका हाके, ज्योती हाके, सविता हाके, स्वाती हाके यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आकांक्षा खांडेकर यांनी केले.

# राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ जिल्हा चिटणीसपदी विक्रम पाचंगे यांची निवड



जळकोट(विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट बीट मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानमोडी येथील प्राथमिक पदवीधर शिक्षक असलेले श्री विक्रम बलभीमराव पाचंगे यांची राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य जिल्हा चिटणीसपदी निवड करण्यात आली. यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नागपल्ले उपाध्यक्ष ,सुखदेव भालेकर, सरचिटणीस संतोष भोजने व महिला प्रदेशाध्यक्ष रेखा सुडे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार श्री प्रवीण स्वामी सर, परमेश्वर साखरे जिल्हा कार्याध्यक्ष, गोविंद कुंभार तालुकाध्यक्ष उमरगा, माधव धुळे ,रामू जमादार, शाहूराज हुलगे मनोज कुमार गुरव, मारुती खमितकर, विजय सगर यांच्या उपस्थितीमध्ये श्री विक्रम पाचंगे यांच्या निवडीचे पत्र देण्यात आले विक्रम पाचंगे हे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार महाराष्ट्र शासन पुरस्काराने सन्मानित असून त्यांच्या उपक्रमशील कामगिरीमुळे आजपर्यंत त्यांना अनेक राष्ट्रीय तथा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले आहे या निवडीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# दोन मोबाईल गेले चोरीला: गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रितेश धनराज भोसले, वय १९ वर्षे, रा. बिरवली ता. औसा जि. लातुर यांचा अंदाजे ७,००० किंमतीचा मोबाईल फोन व ज्ञानेश्वर डिकले यांचा १३,००० किंमतीचा मोबाईल फोन असा एकुण २०,००० किंमतीचा मोबाईल हे दि. २३.०५.२०२६ रोजी २३.०० ते दि.२४.०५.२०२६ रोजी ०५.०० वा. सु. शिवनेरी बॉईज हॉस्टेल जिजाउ चौक बार्शी नाका धाराशिव चे रुमचे खिडकीचे ओट्यावरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रितेश भोसले यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**
**9284321472**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649